**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

## वनमहोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठात पाचशे झाडांचे वृक्षारोपण

### कुलगुरुंच्या हस्ते वृक्षारोपणाने सुरुवात

### महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाचा विद्यापीठात शुभारंभ

अमरावती.

महाराष्ट्र शासनाने यावर्षी १३ कोटी वृक्षलागवडीचे धोरण निश्चित केले असून त्यानुसार महाराष्ट्रभर वृक्षारोपण होत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शिक्षक वसतिगृहाच्या मागील जागेवर कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख, व्य.प. सदस्य डॉ.एस.के. ओमनवार, यांचेसह इतरांनी वृक्षारोपण केले.

विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृह परिसर आणि विविध ठिकाणी दि. ३ जुलै ते ३१ जुलै, २०१८ या कालावधीत सर्व विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हस्ते पाचशे झाडांचे वृक्षरोपण होणार आहे. मागील वर्षीसुद्धा विद्यापीठाने पाचशे झाडांचे वृक्षारोपण केले होते, त्यापैकी शंभर टक्के झाडे जीवंत आहेत. ४७० एकराचा विद्यापीठ परिसर निसर्गरम्य असून या परिसरामधील सर्व झाडे पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरली आहे.

आज झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये प्रभारी वित्त व लेखा अधिकारी श्री मंगेश वरखेडे, कार्यकारी अभियंता डॉ. शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, अधिसभा सदस्य श्री अमोल ठाकरे, श्री सुनिल मानकर, विद्वत परिषद सदस्य डॉ. अरुण चव्हाण तसेच विविध प्राधिकारिणींचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांनी वृक्षारोपण केले. वृक्षलागवड कार्यक्रमासाठी उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांचे मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतलेत.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०२/०७/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी